MHKO180000252015

**नियमीत दिवाणी दावा क्र.०३/२०१५ मधील**
**निशाणी क्र.६७ खालील आदेश.**
**(नम्रता सुगंध डोंगरे वि. जिजाबाई कांबळे आणि इतर.)**

वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वादी यांच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाईकरीता दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी वादी ही अज्ञान असल्याने अज्ञान पालनकर्ती म्हणून वादी यांच्या आईचे नाव दावेतील सरनामेमध्ये नमूद करण्यात आले होते. तसेच, प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी वादीचे वय '१४' वर्ष असे नमुद करण्यात आले होते. प्रस्तुत दावा प्रलंबीत असतेवेळी वादी ही सज्ञान झाल्यामुळे व वादीचे वय आज रोजी '२३' वर्ष इतके असल्यामुळे दाव्याच्या सरनाम्यामध्ये त्या अनुषंगाने दुरुस्ती करणे गरजेचे आहे. त्यामुळे, वादी हिच्या नावासमोर असणा-या 'व.व.१४' मधील '१४' या अंकास काट देवून त्याठिकाणी '२३' हा अंक नमूद करण्यास तसेच, दाव्याच्या सरनाम्यामध्ये 'तर्फे अज्ञान पालन करणार आई सौ.शोभा सुगंध डोंगरे, व.व.४०, धंदा-घरकाम, रा.सदर' हा मजकूर वगळण्यास परवानगी मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदर दुरुस्ती न केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०४. उभयपक्षाच्या विद्यमान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. दोन्ही पक्षांतर्फे त्यांच्या कथनानुरुप युक्तिवाद करण्यात आला.

०५. दावा, प्रस्तुत अर्ज व त्यावरील प्रतिवादींनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन आणि कायम मनाईकरीता दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुतचा दावा दाखल करीत असतेवेळी वादी ह्या अज्ञान असल्यामुळे वादी यांच्या अज्ञान पालनकर्ती म्हणून वादी यांच्या आईचे नाव दावेतील सरनामेमध्ये नमूद करण्यात आले होते.

प्रस्तुत दावा प्रलंबीत असतेवेळी वादी ह्या सज्ञान झाल्यामुळे त्या अनुषंगाने दाव्याच्या सरनामेमध्ये उपरोक्त नमूद दुरुस्ती करण्याकरीता वादी यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लावण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. तसेच, वादी यांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याच्या स्वरुपाचे कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. वादी ह्या सज्ञान झाल्यानंतर त्यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज पाचशे रुपये इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :-

**:: आदेश ::**

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रक्कम रुपये पाचशे फक्त) इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये प्रस्तुत अर्जातील नमुद दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्ती प्रत प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल करावी. तसेच, दुरुस्त दाव्याची प्रत्येकी एक प्रत प्रतिवादींना द्यावी.

३. वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रक्कम रुपये पाचशे फक्त) प्रतिवादींना द्यावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(प्रस्तुतचा आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2025.02.01 17:48:07 +0530

दिनांक : ०१.०२.२०२५ (बाळासाहेब श्री. गायकवाड)

कुरुंदवाड. दिवाणी न्यायाधीश क. स्तर ,

कुरुंदवाड.